# ते दोलायमान विश्व

**प्रकाश गोळे**

गेली दोन-तीन वर्षे कोकणच्या किनाऱ्यावर मी खूप भटकलो. खूप काही पाहिलं, अनुभवलं, मनात साठवून ठेवलं. असा समुद्र दिसला, भावला की तसा आजपर्यंत जाणवला नव्हता. मला वाटतं, ज्या वयात तुम्ही सागराला भेटायला जाता, त्याच वयाचा होऊन तोही तुम्हाला भेटायला येतो. लहानपणी मीही समुद्रकिनाऱ्यावर गेलो होतो. वाळूत खेळलो होतो, शंखशिंपले जमवले होते. लाटात पाय भिजवले होते. त्यावेळी तोही हसत, नाचत माझ्याबरोबर बागडला होता. नाजूक लाटांचे तुषार फुलांसारखे त्याने माझ्यावर उधळले होते. तरल 'फेनमिषे' त्याने मला खोटी खोटी भीती दाखवली होती. तरीही त्याच्या पाठीवर स्वार होऊन दूर देशी जाण्याची स्वप्ने मी पाहिली होती.

यावेळी मी त्याला भेटलो एक अभ्यासक, संशोधक म्हणून आणि यावेळी त्याचं जे रूप दिसलं, ते विलक्षण प्रगल्भ, उत्तुंग आणि अफाट होतं. त्याची नजर अजूनही हसरीच होती, पण मी जेव्हा त्याच्या डोळ्यात डोकावून पाहिलं तेव्हा त्याच्या मनाच्या गाभाऱ्याचा थांग लागणं अशक्य आहे, असं मला जाणवलं. पुढे येणारी त्याची प्रत्येक लाट विश्वाची लय दर्शवीत होती. मागे जाणारी प्रत्येक लहर अनंताच्या पताका मिरवीत होती.

भरती-ओहोटीच्या विलक्षण चंचल, अस्थिर रेषेवर मी वावरलो. इथलं विश्वच दोलायमान, ज्याच्या सीमा-सरहद्दी क्षणभरही स्थिर रहात नाहीत असं. पुढे येणारी प्रत्येक लाट इथे नवे वातावरण घेऊन येते. नवे नजराणे पसरते. अनेकांची गात्रं फुलवते, अनेकांच्या आशा पल्लवित करते आणि आपली रेषा उमटवून जाते. मागे जाणारी प्रत्येक लहर नवी हद्द दाखवीत जाते. रहस्यामागून रहस्यं उलगडून ठेवते आणि तरीही खूपसं काही दडवून ठेवते. मग एखाद्या उंच खडकावर उभं राहून जेव्हा आपण त्या सतत हलणाऱ्या दोलायमान, विलक्षण अस्थिर रुपाकडे पाहतो, त्यावेळी असं वाटतं की एका प्रचंड मुशीत विश्वातली सारी रसायनं वितळली जात आहेत. खोल कुठेतरी तिच्या तळात उत्क्रांतीची सुरुवात होते आहे, एकपेशीय जीव एकमेकांना जोडले जाऊन त्यांचे धागे, साखळ्या, जाळ्या तयार होत आहेत. त्यावर बहुपेशीय जीव तरंगू लागले आहेत. जलचर आणि मासे रांगताहेत, पोहताहेत आणि राक्षसी समुद्रसर्पांची भेंडोळी सुस्त पहुडली आहेत. खोल कुठेतरी भूमंचाच्या पट्ट्या सरकताहेत, पहाड वर उचलले जाताहेत, दऱ्याखोरी गटांगळ्या खाताहेत. याचवेळी एक मोठी लाट दणदिशी येऊन तुम्हाला नखशिखांत भिजवते आणि तुमच्या तंद्रीचा भंग करते.

हा समुद्र आता आपल्या लहानपणच्या खेळगड्याच्या पाठीवर नाजूक थाप मारणारा समुद्र नसतो तर गुगली टाकून संशोधकाची दांडी उडवणारा समुद्र असतो!



कित्येक वर्षांनी मी आता पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर जाणार होतो. अभ्यासक-संशोधकाचा चष्मा लावला तरी वृत्ती पूर्वीसारख्याच खेळकर, हलक्या-फुलक्या होत्या. मनात एक हुरहूर मात्र होती. आता नवीन काही दृष्टीस खरंच पडेल का? अशी. एकेकाळी समुद्रकाठच्या वाळूत मी खेळलो असलो तरी पलीकडे पसरलेल्या खडकांतून कुठे हिंडलो होतो. भरतीच्या लाटा अंगावर घेतल्या असल्या तरी ओहोटीचा चिखल कुठे तुडवला होता. प्राध्यापक जोश्यांना मात्र रत्नागिरीच्या किनाऱ्याचा तसू न् तसू माहीत होता. तेव्हा त्यांच्या सरावलेल्या नजरेचा फायदा घ्यायचा म्हणजे सुरुवात रत्नागिरीपासूनच करायची असं आम्ही ठरवलं.

जाकी-मिऱ्याच्या खडकाळ किनाऱ्यावर आम्ही पोहोचलो, तेव्हा ओहोटीला सुरुवात झाली होती. वाळूतून लहानमोठ्या रेषांनी पाण्याचे ओहोळ समुद्राकडे वहात होते. किनाऱ्यावरचे लहान दगडगोटे उघडे पडले होते आणि त्यांची ओली शरीरे उन्हात चमकत होती. जमेल तो दगड उचलून त्याखाली काही दडलेले आहे का, हे प्राध्यापक महाशय काळजीपूर्वक पहात होते आणि तो दगड जसाच्या तसा पुन्हा ठेवून द्यायचा बरं का, असं आम्हाला बजावीत होते. प्राध्यापकांची सराईत नजर आणि हात जसे कामाला लागले, तसतसे समुद्राचे रत्नभांडार खुले होऊ लागले. वाळूत अर्धवट रुतलेले तारामासे (स्टारफिश किंवा सीस्टार) दिसले, खडकाखाली दडलेले ब्रिटल स्टार हे लांब अवयव असलेले प्राणी दिसले, दोन खडकांमधल्या जलकुंडात पहुडलेल्या समुद्रकाकड्या दिसल्या आणि चिखलाच्या गोळ्यासारखे दिसणारे व स्वतःची रेष चिखलात मागे ठेवणारे ऑन्किडिअम सापडले. ओल्या खडकावर पसरलेले झुअॅन्थसचे मखमली गालिचे पाहून मी हरखून गेलो, तर सतत चाल करून येणाऱ्या लाटांशी झुंज घेणाऱ्या खडकांवर तपस्व्यासारखे ताठ बसलेले बारनॅकल पाहून आश्चर्यचकित झालो. लहान मुलाच्या अधिरतेने मी प्राध्यापकांच्या मागे मागे हिंडत होतो आणि अधाशासारखं हे सारं नजरेत साठवीत होतो. असं भांडार समुद्राने माझ्यासाठी आजपर्यंत कधी खुलं केलं नव्हतं!

लवकरच आम्हा अभ्यासकांचा एक चमू तयार झाला. आमच्या चमूतली सुजाता ही सागरी वनस्पतींची अभ्यासक. तिला अधूनमधून बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीमधल्या माधवीची साथ मिळाली. याच संस्थेतले, खारफुटीच्या जंगलांचे अभ्यासक डॉ. संजय देशमुखही आमच्यात मिसळले आणि आमच्या अभ्यासाला हातभार लावते झाले. कोल्हापूरचे वनस्पतीतज्ञ प्रा. महाजन आणि गोव्याच्या नॅशनल ओशनोग्राफी संस्थेतले तज्ञ यांनी वनस्पती ओळखण्यास आम्हाला मदत केली. आमच्यातला सागरी प्राणी-जीवनाचा अभ्यासक होता अमीत. महाराष्ट्राच्या वनविभागाचे सुभाष पुराणिक हेसुद्धा आमच्याबरोबर सागरी प्राण्यांचा शोध घेत हिंडले. पण कोकणची जवळपास संपूर्ण किनारपट्टी पालथी घातली ती अमीत, सुजाता आणि मी या सहा डोळ्यांनी आणि सहा पायांनी!

कोकणच्या समुद्राची अनेकविध रुपे आम्ही अनुभवली. सह्याद्रीचा घाटमाथा उतरून तुम्ही कोकणात येता, तेव्हा तुमच्या चेहऱ्यावर उत्सुकता असते. दूर कुठे अंतर तुटलेले दिसतेय का, निळ्या पृष्ठभागावर उन्हाची चमचम डोळे दिपवतेय का, याचा वेध नजर घेत असते. टेकडीमागून टेकडी ओलांडीत तुम्ही पश्चिमेकडे जात असता. अधूनमधून भेटणाऱ्या जंगलाच्या हिरवाईतही रेंगाळावेसे तुम्हाला वाटत नाही आणि अचानक तुमच्या पुढ्यातले अंतर तुटते. ती निळसर, चंदेरी चमचम सापडते, नजर दूर दूर फिरून पुन्हा परत येते. क्षितीज तिला भेटत नाही. पण ती पूर्ण समाधानी असते. ते अफाट अंतर हेच तिचे निधान असते.

रस्ता वळणावळणाने आत खाली उतरतो. भातशेतातून, एखाद्या वाडीतून पुढे जातो. खाजणातल्या चिखलात उतरलेल्या एखाद्या राखी किंवा समुद्री बगळ्याला तुमची नजर टिपते आणि नारळी-पोकळीची गर्दी ओलांडून रस्ता सुरूच्या बनापाशी संपतो. बनात निरव शांतता असते. जमिनीवर सुरूच्या सुयांचा खच पडलेला असतो. त्यात पाऊल बुडवीत तुम्ही पुढे जाता आणि समुद्राची भेट होते ती प्रथम तुमच्या कानांना, डोळ्यांना नव्हे! ती घनगंभीर गाज कानांवर येते. एका आभाळाएवढ्या प्रचंड आणि अज्ञात शक्तीच्या समीप आपण जातोय या विचाराने तुम्ही भारले जाता.

सुरूच्या छायेतून तुमचे पाऊल पडते सोनेरी वाळूवर. वाळू कुठे उन्हात तापत असते, तर कुठे वनस्पतींच्या आच्छादनाखाली दडलेली असते. वाळूतून मुळे पसरवणाऱ्या आणि पाण्याचा, मातीचा शोध घेणाऱ्या अनेक प्रकारच्या वनस्पती तुम्ही पाहाता, सुरूच्या पलीकडे पसरलेली काटेरी केवड्याची अभेद्य तटबंदी आणि त्याच्याही वर कोठे कोठे डोकावणारी उंडी (किंवा उंडल) पांगारा आणि भेंड यांची झाडे तुम्हाला दिसतात आणि भुसभुशीत वाळूत रुतणारे पाय ओढीत तुम्ही भरती- ओहोटीच्या टप्प्यात येता. इथे सागराने आपल्या लाखो हातांनी वाळू अशी सपाट, घट्ट चेपलेली असते की त्यावर तुम्ही बैलगाडी आणि मोटरसायकलही चालवू शकता. आता त्या निळ्या, पारदर्शक पृष्ठभागावर प्रत्यही तयार होणाऱ्या लाटांच्या जलस्तंभावर तुमची नजर खिळते. कोरडेपणाला सरावलेले तुमचे शरीर लाटेच्या प्रत्येक हालचालीबरोबर मागे सरू पाहते. एवढ्यात एका उंच सुरूवरून एका भरदार अंगाच्या पक्ष्याने हवेत उशी घेतल्याचे तुम्हाला जाणवते. आपल्या लांब, शक्तिमान पंखांवर तरंगत तो सागरी गरुड तुमच्या रोखाने येतो, पण तुम्हाला ओ[illegible]न सागराच्या निळ्या अवकाशात शिरतो. आकाशाच्या निळ्या घुमटात विहरणाऱ्या त्या पक्ष्याकडे पाहताना जाणीव होते की तुमच्या मनातले सागराचे चित्र पूर्ण झाले आहे!

पहाटेच्या धूसर प्रकाशात सागराचे रुप आणखीनच गूढरम्य भासते. आता अवकाश आणि सागर यांच्यातल्या सीमा पुसलेल्या असतात. धूसर प्रकाशात न्हालेल्या आसमंतातून लाटांचा पडघम तेवढा कानांवर येतो. ती लय जुळते तुमच्या हृदयाच्या स्पंदनाशी आणि कोणी ओळखीचं माणूस दिसेल म्हणून तुम्ही तुमच्या हातातल्या विजेरीचा झोत पुढे फिरवता. त्यात नजरेत येतात खेकड्यांच्या सेना, लाटा अंगावर घेत भक्ष्य टिपणाऱ्या. कुठे एखाद्या पक्ष्याची हालचाल त्या धूसरात विरून जाते तर काळोखात बुडालेल्या खडकात अदृश्य जीवांची चाललेली खजबज ऐकून छा[illegible] दडपते.

पण लवकरच रेषा, आकार स्पष्ट होऊ लागतात. पूर्वेकडून थंड वारा येतो. समोरचे मोकळे अवकाश पाण्याने काठोकाठ भरते, सागर आणि आकाश यांच्यातली रेष दिसते. तीवर डोलणारी गलबेत नजरेत येतात आणि सागराचे आणखी एक चित्र पूर्ण होते!

सागराच्या साऱ्या सुप्त शक्ती जाणवतात मात्र रात्रीच्या वेळी. आसमंतातला काळोख सतत ढवळला जातोय. त्या काळ्या रसायनात जीवन आणि मृत्यू यांचा सतत संघर्ष चाललाय असा भास होतो. हा काळोख स्तब्ध, दाट, अभेद्य नसतो. तो विलक्षण पारदर्शी, जिवंत वाटतो. कधी अकस्मात त्याच्यावर प्रकाशाच्या रेषा उमटतात, असंख्य चिमुकल्या दिव्यांनी

तो तेजाळला जातो आणि चमचमणाऱ्या प्रकाशशलाकांनी उजळून निघतो. सागराने पोसलेल्या निरनिराळ्या जीवांच्या या किमया. आजूबाजूस कोणी नसताना अशा वेळी सागर किनाऱ्यावर हिंडणं हा एक अविस्मरणीय आनंद असतो. तुमच्या भोवती सतत हालचाल असते, ती अदृश्य असते म्हणूनच उत्कंठा वाढवीत जाते. मग अमावास्येच्या गडद काळोखात दूरवरच्या दीपगृहाचा झोत नजरेत येतो किंवा पौर्णिमेच्या टिपूर चांदण्यात पलीकडच्या खडकावरून एखादा धूसर आकार पाण्यात डुबी घेतो, तेव्हा सागराचे आणखी एक चित्र मनात पूर्ण होते.

सकाळ होते तशी सागरकिनाऱ्यावरची वर्दळ वाढत जाते. प्रातर्विधीसाठी माणसं येतात, पाठोपाठ कुत्री आणि गायी येतात. र[illegible] असेल तर रापणसंघाचे लोक जमतात आणि आपले प्रचंड गोल जाळे उलगडू लागतात. भल्या पहाटे समुद्रावर गेलेल्या होड्या परतू लागतात आणि ओंडके आडवे टाकून त्यांना वाळूवर ओढून घेण्यासाठी बाया, पोरी कोळ्यांना मदत करू लागतात. आणलेला माल मग जाळ्यातून उतरवला जातो, गलपक्षी हवेत घोंघावू लागतात. एखादा गरुडही बाजूला येऊन शांतपणे बसून राहतो. जाळी सुकवण्यासाठी, दुरुस्तीसाठी अंथरली जातात, मालाचं वर्गीकरण सुरू होतं, नको असलेले मासे पक्षी-प्राण्यांसाठी फेकण्यात येतात किंवा सुकवण्यासाठी, खतासाठी बाजूला सारले जातात तर जाळ्यात गावलेला एखादा समुद्रसर्प लाटांमध्ये भिरकावला जातो.

दुपार होते, तसे ऊन जागू लागते. वाळू तापू लागते आणि गर्दी पांगते. भरती असेल तर मोठे खेकडे आपल्या खोल बिळांतून बाहेर पडतात. बाकदार चोचीचे कर्ल्यू आणि व्हिम्ब्रेल पक्षी पाण्याच्या रेषेवर येतात. पलीकडच्या खाडीत उथळ पाण्यात बाणासारखे डोकं खाली, शेपूट वर करून मासे वाळू चोखतात. अशावेळी खारफुटीच्या आडव्या फांदीवर काळ्या डोक्याचा खंड्या बसलेला दिसतो, तर ब्राह्मणी घार आकाशात संथ उडत असते. सुरूच्या बनांतून, केवड्याच्या पडद्यातून उष्णतेचे कढ बाहेर येत असतानाच तुम्हालाही डुलकी लागते आणि सागराचे आणखी एक चित्र स्वप्नात पूर्ण होते.

सायंकाळ होते, सागरावरून भिरभिरत येणारा शीतल वारा शरीर सुखावतो, मन हलकं करतो. सूर्याचे तिरपे किरण प्रत्येक लाटेच्या शिरोभागास असा नाजूक सोनेरी स्पर्श करतात की लाटन् लाट फुलारते आणि एखाद्या अवखळ पोरीसारखी नाचत जवळ येते. तिला भेटायला तुम्हीही आतुर होता. पाण्यात पाय भिजवता आणि हात लांबवून भेटू पाहता. पण ती तिथे नसतेच. दूरवरून पुन्हा तशीच नाचत जवळ येताना दिसते.

आतापर्यंत वाळूवर शांतपणे बसून राहिलेला शुभ्र पक्ष्यांचा थवा आता एकाएकी पंख पसरतो आणि हवेत तरंगू लागतो. पाहता पाहता तो निळ्या अवकाशात शिरतो, समुद्र आणि आकाश जिथे एक होतात, त्या दिशेने हवा कापीत कापीत दूर जातो.

सूर्याचा लाल गोळा सागरात डुबी घेण्यासाठी आकाशातून खाली उतरताना आता दिसू लागतो. ते अस्मानी दृश्य पाहण्यासाठी, तो दैवी क्षण डोळ्यात साठवण्यासाठी जणू सारी सृष्टी आता श्वास रोखते, निश्चल होते. सागरात आतवर घुसलेला पर्वताचा बाहू स्तब्ध राहून मावळत्या सूर्याला अर्घ्य देतोय असा भास होतो.

सूर्याचा अर्धगोल आता सागरावर विसावतो. सावकाश त्यात विलीन होऊन जातो. डोंगरावरून, झाडांवरून, खडकांवरून उतरून एकेक तेजोकण लाटा ओलांडीत क्षितीजाकडे जाताना दिसतात आणि मनात एकाकीपणाची भावना दाटते. निस्तेज लाटांकडे पहात तुम्हीही मागे वळता, तुमचे शरीर किनारा जवळ करू पाहते, पण चित्त सागरात हरवलेले असते!

★ ★ ★

**प्रकाश गोळे.**
१/ए, अभिमानश्री सोसायटी,
पाषाण रस्ता,
पुणे - ४११ ००८.

## ... आणि देव देतो सहा!

(पान क्र. ११८ वरून)

किथ-बेकीला ठाऊक आहे की आपण आपल्या मुलांना श्रीमंती थाटात नि लाडात वाढवू शकणार नाही. परंतु, प्रेम, शिस्त व समज देऊन त्यांना वाढवायचा त्या दोघांचा निर्धार आहे.

**(मूळ कथा : Special Delivery)**

★ ★ ★

**जोसेफ तुस्कानो.**
५०३, विराज अपार्टमेंट, राम टॉवर जवळ,
ऑफ लिंकिंग रोड, बोरिवली (प.),
मुंबई - ४०० ०९१.

**रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर (सेंट्रल) ॲक्ट**
**नियम क्र. १० (सेक्शन १०) नियम १९५६**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | २४७, राजा राममोहन रॉय मार्ग, महाराजा बिल्डिंग, गिरगांव, मुंबई-४. |
| २) | प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | राजेंद्र शंकर कुलकर्णी |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | २४७, राजा राममोहन रॉय मार्ग, महाराजा बिल्डिंग, गिरगांव, मुंबई-४. |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : | राजेंद्र शंकर कुलकर्णी |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | २४७, राजा राममोहन रॉय मार्ग, महाराजा बिल्डिंग, गिरगांव, मुंबई-४. |
| ५) | संपादकाचे नाव | : | राजेंद्र शंकर कुलकर्णी |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

**मी राजेंद्र शंकर कुलकर्णी, मुंबई जाहीर करतो की वरील सर्व तपशील माझ्या माहितीप्रमाणे व माझी खात्री आहे त्यानुसार खरा आहे.**

**मुंबई.**
दि. १०.१०.९८.

**राजेंद्र शंकर कुलकर्णी**

# शिबाराणीचे भयस्वप्न

**प्रा. श्रीनिवास हेमाडे**

## रसेलच्या या कथेविषयी...

**जगत्तविख्यात तत्वज्ञ बर्ट्रांड रसेलची एक कथा 'धनंजय'च्या वाचकांसाठी मी दिवाळी '९७ ला दिली होती. 'गार्डीयन्स ऑफ पार्नेसस'ही गेल्या दिवाळी अंकातील कथा रसेलच्या 'सॅटन इन सबअर्ब्ज' या कथासंग्रहातील होती. तेव्हा हे रसेलचे एकमेव ललित लेखन असावे असे मी म्हटले होते. तथापि या कथासंग्रहानंतर रसेलने आणखी काही कथा लिहिल्या असून त्याचा कथासंग्रह उपलब्ध आहे. अशी माहिती मला स. प. महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापिका डॉ. वैजयंती गांगल यांनी दिली. तोच 'नाईटमेअर्स ऑफ एमिनंट पर्सन्स' हा कथासंग्रह. प्रस्तुतची कथा त्या कथासंग्रहातीलच. या कथासंग्रहात रसेलने काही प्रसिद्ध व्यक्तींना भयस्वप्न पडलेच तर ते कसे असेल याची कल्पना केली आहे. रसेलचे हे लेखन लक्षात आणून दिल्याबद्दल डॉ. वैजयंती गांगल यांचे आणि कथासंग्रह मला उपलब्ध करून दिल्याबद्दल स. प. महाविद्यालयाचे तत्त्वज्ञान विभागप्रमुख प्रा. विजय कारेकर यांचा मी ऋणी आहे.**

### अनुवादकाचे टिपण

कथा वाचनास पोषक ठरेल आणि शिबाराणीच्या भयस्वप्नाचाही अन्वयार्थ लागेल, या हेतूने मीही पार्श्वभूमी देत आहे. शिवाय अनुवादकाचे ते काम असतेच.

शिबाराणी, सोलोमन व बिल्झेबब् ही पात्रे बायबलमध्ये भेटतात. बायबल हा ख्रिस्ती परंपरेचा मूलाधार आहे. याची तर आपणास कल्पना आहेच. क्विन ऑफ शिबा व सोलोमन ही जुन्या करारातील पात्रे आहेत तर बिल्झेबब् हे सैतानाचे एक नाव. येशूख्रिस्ताच्या बारा शिष्यांमधील एक शिष्य मॅथ्यू याने ख्रिस्ताचे शुभवर्तमान सांगण्याकरिता 'मॅथ्यू' याच नावाचे प्रवचन लिहिले. त्यात बिल्झेबब् हे नाव धारण करून सैतान येतो. तो अत्यंत बुद्धिमान, चाणाक्ष व कुटील असतो. तो राणीला फसवतो. त्याची ही कथा.

प्राचीन ख्रिस्ती परंपरेनुसार शिबाराणी ही दक्षिणपूर्व अरब प्रांताची राणी. अद्यापि इस्लाम धर्माचा उदय व्हायचा आहे. अशा इसवीसनापूर्वीच्या दहाव्या शतकात शिबाराणी किमान चाळीस वर्षे राज्य करीत असावी. असे एनसायक्लोपिडिआ ब्रिटानिका सांगतो. अत्यंत देखणी, सुंदर व प्रतिभावान सामर्थ्यशाली राज्यकर्ती म्हणून शिबाराणी प्रसिद्ध होती. तिला साम्राज्य विस्ताराची तितकी महत्त्वाकांक्षा नव्हती. तथापि आपले राज्य व आपली राजवट नावारुपास यावी. ते जागतिक व्यापार केंद्र बनावे, अशी तिची इच्छा असावी असे दिसते. शिबाराणीचा खजिना सदैव समृद्ध होता. तिला विशेषतः सोने, चंद्रसेनी ऊद आणि हिराबोळ जमविण्याचा छंद होता. व्यापार वृद्धीसाठी तिला सोलोमनची मैत्री हवी होती. कारण ती सोलोमनची दिगंत कीर्ती ऐकून होती. खूप कष्टमय प्रवास करून ती त्याला भेटावयास गेली होती.

सोलोमन हा प्रसिद्ध ज्यू सम्राट डेव्हीडचा पुत्र अ इस्त्रायलच्या साम्राज्याचा एकमेव वारसदार, नंतरच्या वैभवशाली साम्राज्याचा शिल्पकार. डेव्हीडने युफ्रेटीस नदी व इजिप्तच्या सीमाप्रांतात ज्यूंचे साम्राज्य उभे केले. फिलिस्तीनी हे ज्यूंचे पारंपारिक शत्रू. सोलोमनची आई बाथशिबा ही डेव्हीडच्या लष्करातील एका उच्च लष्करी अधिकाऱ्याची पत्नी. डेव्हीडपासून सोलोमन हा पुत्र तिला लाभला.

सोलोमनची फार सुंदर कथा बायबलच्या जुन्या करारात आढळते. त्याचे राज्यारोहण, साम्राज्यविस्ताराचे प्रयत्न आणि त्याचे अत्यंत वैभवशाली, विलासी जीवन. पूर्वायुष्यात तो सच्चा प्रभुसेवक होता. पण नंतर उत्तरायुष्यात मात्र तो फारच विलासी जीवन जगू लागला. त्याने अनेक परदेशी स्त्रियांशी विवाह केले, शेकडो रखेल्या ठेवल्या आणि शेवटी त्याच्या जीवनाची शोकांतिका झाली.

अशा सोलोमनला शिबाराणी भेटते. ती त्याला नजराणे देतेच. पण त्याच्या बुद्धीचातुर्याची परीक्षाही घेते. त्यातील एक कूटप्रश्न असा : 'असे काय आहे की ज्याला दहा भोके असून जेव्हा एक उघडे असते तेव्हा नऊ बंद असतात आणि ते एक बंद होते तेव्हा नऊ चालू होतात?' या शिबाराणीच्या कूटाला सोलोमनचे उत्तर असते 'माणूस!' जेव्हा तो जन्माला येतो तेव्हा त्याची बेंबी बंद होते आणि इतर नऊ भोके डोळे, कान, नाक, तोंड इत्यादी चालू होतात!!

या उत्तरावर शिबाराणी जाम खूष होते. ती त्याच्या जवळपास प्रेमातच पडते. पुढे दंतकथांनुसार त्यांना मुलगा होतो. त्याचे नाव 'मेनेलिक पहिला.' या मेनेलिक पहिलाचा एक अत्यंज म्हणजे इथिओपियाचा संस्थापक सम्राट मेनेलिक दुसरा. १७ ऑगस्ट १८४४ ते १२ डिसेंबर १९१३ हा त्याचा काळ समजला जातो. (एन्सायक्लोपिडीआ ब्रिटानिका)

या कथासंदर्भानुसार 'शिबाराणीचे भयस्वप्न' काय असू शकते? तर शिबाराणीला बिल्झेबब् भेटतो आणि आपल्या सैतानी सामर्थ्याने तिला शब्दमायेत अडकवून भुलवतो. मायामहालात गुंतवून तिला अखेरीस फसवितो. आपण फसविलो गेलो आहोत आपली सुखस्वप्ने उध्वस्त झाली आहेत, या जाणिवेपेक्षा अधिक वेगळे भय एखाद्या प्रामाणिक व्यक्तीस आणखी वेगळे काय असू शकते? रसेलला कदाचित हेच म्हणायचे असावे.

❖ ❖ ❖